# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१८

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक २८ मार्च, २०१८ / चैत्र ७, १९४० ( शके )**

**(१) शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्यांक विकास आणि वक्फ मंत्री**
**(२) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री**
**(३) पर्यावरण मंत्री**
**(४) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३४**

---

### नेरळ (ता.कर्जत, जि.रायगड) येथील दिलकॅप इंजिनियरिंग कॉलेजने अवैधरित्या शिक्षक कार्यरत असल्याचे दर्शवून मान्यता मिळविल्याबाबत

**(१) * ११६२०६ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेरळ (ता.कर्जत, जि.रायगड) येथील दिलकॅप इंजिनिअरिंग कॉलेजने अवैधरित्या शिक्षक कार्यरत असल्याचे दर्शवून मान्यता मिळविण्याप्रकरणी चौकशी करुन कारवाई करण्याबाबत दिनांक १५ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.शालेय शिक्षण मंत्री यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत सिटीझन फोरम फॉर सॅन्क्टीटी इन एज्युकेशनल सिस्टीम या संघटनेने केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सुरु असलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी विभागीय सहसंचालक, तंत्र शिक्षण, मुंबई यांच्याकडून चौकशी अहवाल संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई यांच्याकडे प्राप्त झाला असून संचालक, तंत्र शिक्षण यांच्या स्तरावर चौकशी अहवालाची छाननी पूर्ण झाली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

दैनिक महाराष्ट्र टाईम्स मध्ये दिनांक ७/१०/२०१७ रोजी याबाबत बातमी प्रसिध्द झाली होती. त्याचप्रमाणे सिटीझन फोरम फॉर सॅन्क्टीटी इन एज्युकेशनल सिस्टीम या संघटनेने तक्रार केली आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी विभागीय सहसंचालक, तंत्रशिक्षण, मुंबई यांच्यामार्फत चौकशी केली आहे. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकानुसार सदर संस्थेत शिक्षक नसणे, भविष्य निर्वाह निधी न भरणे, परीक्षेचे मानधन न देणे हया बाबी चौकशीत आढळून आल्या आहेत.

याबाबत संस्थेवर कारवाई करण्याचे अधिकार अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली या केंद्र शासनाच्या शिखर संस्थेस असल्याने संचालक, तंत्र शिक्षण यांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेला कळविले आहे. तसेच चौकशी अहवाल शुल्क नियामक प्राधिकरण आणि मुंबई विद्यापीठ यांना देखील पुढील कार्यवाहीसाठी संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत पाठविण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## काळाचौकी (मुंबई) येथे बनावट औषधांचा साठा जप्त केल्याबाबत

**(२) * ११४४१६ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काळाचौकी (मुंबई) येथील कैलाश फार्मा या घाऊक विक्रेत्यावर कारवाई करुन अन्न व औषध प्रशासनाने दिनांक २ फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यासुमारास बनावट औषधांचा साठा जप्त केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर प्रकरणी काळाचौकी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असल्याचे दिनांक ८ फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, असल्यास सदर प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय.

(२) होय.

(३) मे. मेयर ओरगॅनिक प्रा.लि. या उत्पादकाने त्यांच्या “कॅल्सिमॅक्स टॅबलेट ५००” या नावाच्या बनावट औषधांचा पुरवठा होत असल्याची शंका अन्न व औषध प्रशासनाकडे व्यक्त केली होती. याबाबत प्रशासनाने बाजारातून प्राथमिक माहिती घेतली. सदर माहितीच्या आधारे मे. कैलास फार्मा, काळाचौकी या संस्थेच्या जागेवर धाड टाकली असता सदर ठिकाणी कॅल्सिमॅक्स टॅबलेट ५००, समूह क्रमांक २५८ एसजे ६२७२ या औषधांचा साठा आढळून आला. मे.मेअर ऑर्गनिक या उत्पादकाचे कॅल्सिमॅक्स टॅबलेट ५०० व उपलब्ध कॅल्सिमॅक्स टॅबलेट ५०० च्या लेबलिंग व पॅकिंगमध्ये बारीक सारीक तफावत आढळून आली. सदर साठा बनावट असल्याच्या संशयावरुन चौकशी केली असता, सदर साठा मे.मेयर ऑरगॅनिक या कंपनीचा नसून इतर पूरवठादाराकडून प्राप्त केल्याचे आढळून आले. सदर साठ्यातुन चाचणीस्तव नमुना घेऊन उर्वरीत रु.६६,०३३/- किंमतीचा साठा जप्त करण्यात आला. चाचणीस्तव घेतलेल्या नमुन्यांचा अहवाल अद्याप प्रलंबित आहे.

सदर प्रकरणी पेढीचे भागीदार, पुरवठादार व इतर संबधित अज्ञात व्यक्ती विरुध्द काळाचौकी पोलिस ठाणे, मुंबई येथे प्रथम खबर अहवाल नोंदविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगाव तहसिल अंतर्गत लाभार्थ्यांना धान्य पुरवठा होत नसल्याबाबत

**(३) * ११४९५३ श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्हयातील अंध-अपंग, विधवा, एच.आय.व्ही.ग्रस्त, कॅन्सरग्रस्त, तृतीयपंथी यांना सुमारे २ ते ३ वर्षापासून वाढीव अंत्योदय/प्राधान्य योजनेचा लाभ सन २०१४ पासून मिळाला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जळगाव तहसिल अंतर्गत (पुरवठा शाखा) अन्नपूर्णा योजनेसाठी गत १ वर्षापासून किमान २३६ व त्यापेक्षा जास्त पात्र लाभार्थ्यांना धान्य मिळत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.
(२) केंद्र शासनाकडून अन्नपूर्णा योजनेकरिता माहे एप्रिल, २०१७ पासून अन्नधान्याचे नियतन देण्यात आले नसल्याने जिल्हानिहाय नियतन देण्यात आलेले नाही. केंद्र शासनाकडून सदर अन्नधान्याचे नियतन प्राप्त झाल्यानंतर जिल्हानिहाय नियतन देण्यात येईल.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भातकुली (जि.अमरावती) तालुक्यातील धामोरी, आष्टी, मार्की या गावांना सुरळीत पाणीपुरवठा होण्याबाबत

**(४) * ११५७३४ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भातकुली (जि.अमरावती) तालुक्यातील धामोरी, आष्टी, मार्की या गावांना नियमित पाणीपुरवठा होत नसल्याने १०५ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेअंतर्गत शेवटच्या झोन मधील गावांना सुरळीत पाणीपुरवठा होण्याकरीता चांदुर बाजार मार्ग नया अकोला ते आष्टी पर्यंत स्वतंत्र पाईपलाईन टाकण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी अमरावती यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार उक्त गावांना स्वतंत्र पाईपलाईन टाकून सुरळित पाणीपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

सदर निवेदन अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, अमरावती यांना देण्यात आले आहे.

(२) सदर कामाचा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सन २०१७-१८ च्या कृती आराखडयात समावेश करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील ८० हजार सरकारी शाळा बंद करुन त्यांची संख्या ३० हजारापर्यंतच मर्यादीत ठेवण्याच्या निर्णयाबाबत

**(५) * १०४८२३ श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम),**

**श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमित झनक (रिसोड), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.अनिल बाबर (खानापूर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.सुनिल शिंदे (वरळी), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ८० हजार सरकारी शाळा बंद करुन त्यांची संख्या ३० हजारापर्यंतच मर्यादीत ठेवण्याबाबत शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव यांनी निर्णय घेतला असल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, शिक्षण विभागातील अधिकारी, केंद्र प्रमुखांच्या बैठकीसाठी, दिनांक ७ जानेवारी, २०१८ रोजी औरंगाबाद येथे आलेले प्रधान सचिव, शिक्षण विभाग यांनी गुणवत्तापूर्ण शिक्षणाअभावी पटसंख्या कमी झाली असून, दहा पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्याचा निर्णय झाला असून, त्यानंतर २०, ३० आणि पुढे दिडशे पटसंख्या हा निकष ठेवण्यात येईल व त्यानंतर हजार पटसंख्या हा निकष लावला जावून येत्या १५ वर्षात राज्यातील ८० हजार सरकारी शाळा बंद करुन ही संख्या ३० हजारावर आणण्याचे शिक्षण विभागाचे उद्दिष्ट आहे, असे सांगितले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात सद्या १ लाख दहा हजार सरकारी शाळा असून तेथे दोन कोटी विद्यार्थी शिक्षण घेत असल्याने वाढत्या लोकसंख्येनुसार शाळा वाढविण्याऐवजी शाळा बंद करुन सरकारी शिक्षण संपुष्टात आणण्याचा शासनाच्या या प्रस्तावित निर्णयाला शिक्षण संघटनासह शिक्षक लोकप्रतिनिधी इ.सह सर्वच स्तरातून विरोध होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यामुळे राज्यातील हजारो विद्यार्थी शाळाबाहय व अनेक शिक्षक बेरोजगार होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास,चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शाळांमधील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) नाही.

(३) व (४) शासनाने १२९२ शाळांचे त्यातील विद्यार्थी व शिक्षकांसह समायोजन करण्याबाबत घेतलेल्या निर्णयाविरोधात शिक्षण संघटना, शिक्षक लोकप्रतिनिधी इत्यादींकडून शासनास काही निवेदने प्राप्त झाली आहेत. या अनुषंगाने राज्यातील सर्व १२९२ शाळांची प्रत्यक्ष तपासणी करुन ५६८ शाळांतील विद्यार्थ्यांचे समायोजन नजिकच्या शाळेत करणे शक्य असल्याने या ५६८ शाळांतील विद्यार्थ्यांचे समायोजन नजिकच्या शाळेत करणेबाबत शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांना दि. ३ फेब्रुवारी, २०१८ च्या पत्रान्वये सुचना दिलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लातूर शहरातील व जिल्ह्यातील प्रदूषणाबाबत

**(६) * ११३१२४ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय प्रदूषण नियंत्रण महामंडळाने जाहीर केलेल्या राज्यातील प्रदूषित सतरा शहरांच्या यादीमध्ये लातूर शहराचा समावेश असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाढत्या प्रदूषणामुळे लातूर जिल्ह्यातील नागरिकांना खोकला, टॉन्सील, डोकेदुखी व किडनीसारखे आजार उद्भवत असून लातूर शहरातील १०० मायक्रोग्रॅम परमिनीट एवढे प्रमाण अपेक्षित असतानाही आरएसपीएम व एएसपीएमचे प्रमाण १२८ ते ३४२ वर गेले असल्याचे दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार लातूर शहरातील व जिल्ह्यातील प्रदूषण कमी करण्यासंदर्भात तसेच उक्त आजारांवर नियंत्रण आणण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे. तथापि, वाढत्या प्रदूषणामुळे लातूर जिल्ह्यातील नागरिकांना विविध आजार उद्भवल्याचे आढळून आले नाही.

(३) त्यानुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळमार्फत लातूर शहरातील प्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी कृती आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी करण्याकरिता जिल्हाधिकारी, लातूर व आयुक्त, महानगरपालिका लातूर यांना हवा (प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९८१ अन्वये निर्देश देण्यात आले असून सदर कृती आराखडा अंमलबजावणीचे काम प्रगतीपथावर आहे.

-----------------

## पट्टणकोडोली (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथे सुरु असलेल्या शुध्द पेयजल प्रकल्पातून अळीमिश्रित पाणी येत असल्याबाबत

**(७) * ११४२७२ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पट्टणकोडोली (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथे ग्रामपंचायत व प्रथमेश एंटरप्रायजेस यांच्यावतीने सुरु असलेल्या शुध्द पेयजल प्रकल्पातून अळीमिश्रित पाणी येत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार उक्त गावाला शुध्द पाण्याचा पुरवठा करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) सध्या पट्टणकोडोली गावाला प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या फिल्टरचा वापर करून पाणीपुरवठा करण्यात येत आहे. तसेच राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेतून मंजूर नवीन योजनेचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कळंब (जि.उस्मानाबाद) येथील शासकीय गोदामातील अन्नधान्यात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(८) * ११४५५१ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर),**

**प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब (ता.कळंब, जि.उस्मानाबाद) येथील शासकीय गोदामातून सुमारे १ कोटी ३१ लाख ९६ हजार एवढया किंमतीचा गैरव्यवहार झाल्याप्रकरणी श्री.अशोक नांदलगावकर, तहसिलदार, कळंब व डी.एम.मोरे, अन्न व नागरी पुरवठा विभाग यांच्यावर विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली असून विभागीय चौकशीचे काम अद्याप पूर्ण झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, असल्यास, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

उपायुक्त (पुरवठा) औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी दि.१७.१.२०१८ च्या पत्रान्वये कळंब (ता.कळंब, जि.उस्मानाबाद) येथील शासकीय धान्य गोदामात झालेल्या अन्नधान्याच्या गैरव्यवहाराप्रकरणी जबाबदार श्री.अशोक नांदलगावकर, तहसीलदार, कळंब व श्री.डी.एम. मोरे, अ.का. पुरवठा, कळंब यांच्याविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाईबाबतचा प्रस्ताव (जोडपत्र १ ते ४) शासनास सादर केला आहे. प्रस्तावाची छाननी सुरु असून छाननीनुसार अधिकची माहिती मागविण्यात आली आहे. चौकशी अंती दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गांधीनगर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मुलींच्या वसतिगृहात निकृष्ट दर्जाचे व कमी भोजन दिले जात असल्याबाबत

**(९) * ११५४४० श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या गांधीनगर येथील मुलीचे वसतिगृहामध्ये गरीब विद्यार्थीनी राहत असून त्यांच्याकडून मेस प्रतिमहिना रूपये दोन हजार पाचशे इतके शुल्क घेऊन त्यात दोन वेळेचे जेवन, चहा, नास्ता याचा समावेश असतानां सुध्दा निकृष्ट दर्जाचे आणि कमी जेवण व नाश्ता देत असल्याची तसेच विद्यार्थीनी दहा ते पंधरा दिवसाकरीता गावी गेल्या तरीसुध्दा महिन्याचे शुल्क वसूल करीत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसतिगृहाच्या विद्यार्थीनींनी या संदर्भातील तक्रार कुलसचिव पुरणचंद्र मेश्राम यांच्याकडे केली असता त्यांनी विद्यापीठाच्या वसतीगृहातील जेवण आवडत नसेल तर वसतीगृह सोडून अन्य कुठेही राहू शकता मात्र वसतीगृहात राहायचे असेल तर वसतीगृहातील जेवण करावेच लागेल असे आदेश दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर विद्यापीठातील अधिकाऱ्यांच्या संगनमतानेच या वसतीगृहात मेस चालविणारा गत अनेक वर्षापासून एकच कंत्राटदार मेस चालवित असून त्याची एकाधिकारशाही सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मुलींच्या वसतिगृहातील भोजनालयात निकृष्ट दर्जाचे भोजन व कमी भोजन वा कमी नाश्ता दिल्याबाबत कोणतीही तक्रार विद्यापीठाकडे प्राप्त झालेली नाही. तसेच विद्यार्थीनींनी जेवढे दिवस भोजन घेतले असेल तेवढ्याच दिवसांचे भोजन शुल्क आकारले जाते.

(२) हे खरे नाही, असे कोणतेही आदेश विद्यापीठाच्या कुलसचिवांनी दिलेले नाहीत.

(३) हे अंशत: खरे आहे, वसतिगृहातील सर्व मुलींनी मागील वर्षीच्या कंत्राटदाराच्या भोजन व्यवस्थेबाबत व गुणवत्तेबाबत समाधान व्यक्त करुन त्याच कंत्राटदाराला मागील वर्षीच्या दरानुसार कंत्राट देण्याबाबत लेखी स्वरुपात स्विकृती दिल्यावरच संबंधित कंत्राटदाराला चालू वर्षात कंत्राट देण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात बहिःस्थ विद्यार्थ्यांसाठी अभ्यास केंद्र सुरू करण्याबाबत

**(१०) * ११३६५७ श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठात महाराष्ट्र विद्यापीठ कायदा २०१६ कलम ५ (२२) नुसार बहिःस्थ विद्यार्थ्यांसाठी व्यायामाचे आयोजन करणे, अभ्यासाबाबत मार्गदर्शन करणे यासाठी अभ्यास केंद्र सुरू करणे बंधनकारक असतानाही या केंद्राची उभारणी करण्यात आली नसल्याची बाब दिनांक १५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, छोट्या-मोठ्या नोकरी करून शिक्षण पूर्ण करु इच्छिणारे, लग्नामुळे शिक्षण थांबलेल्या गृहिणी, त्याचबरोबर आवड म्हणून शिक्षण घेणारे असे सुमारे ४० हजार विद्यार्थ्यांची त्यामुळे गैरसोय झाली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ५ (२२) नुसार बहि:स्थ /दूरशिक्षण /मुक्त अध्ययन संकुलाबाबतचा सविस्तर प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचेकडे दि. ६/११/२०१७ रोजी मान्यतेसाठी पाठविला आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने सदर प्रस्तावास मान्यता दिल्यानंतर विद्यापीठाकडून याबाबत योग्य तो धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल.
(२) हे खरे नाही. सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठात बहि:स्थ पध्दतीने बी.ए., बी. कॉम., एम.ए., एम.कॉम., या अभ्यासक्रमांना गेल्या तीन दशकांपासून प्रवेश दिले जातात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात अवैधरित्या गुटखा विक्री सुरु असल्याबाबत

**(११) * १०४७६२ श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.विजय औटी (पारनेर), डॉ.राहूल पाटील (परभणी), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), डॉ.सुनिल देशमुख (अमरावती), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने सन २०१२ मध्ये गुटखा उत्पादन व विक्रीवर बंदी घातली असतांनाही राज्यात अनेक ठिकाणी गुटख्याची विक्री सुरु असुन ग्रामीण व शहरी भागात गुटख्याच्या सेवनाने विद्यार्थी व नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पनवेल (जि.रायगड) तालुक्यात व परभणी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात गुटखा विक्री सुरु असून मुंबईतील सांताक्रूझ परिसरात पोलिसांनी १ कोटी रुपयांचा गुटखा माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये जप्त केला, पुलाची शिरोली (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथे कर्नाटकातून येत असलेला गुटखा दिनांक २० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास पोलिसांनी पकडला, बीड येथील पेठबीड मधील इस्लामपूर भागात गुटखा विक्री करणाऱ्या माफीयाच्या घरावर पोलिसांनी धाड टाकून धारदार शस्त्रांसह सुमारे ३६ पोती गुटखा, एक स्कुटी व जीप दिनांक १६ जानेवारी २०१८ रोजी जप्त केली तसेच अंजनगाव अकोट (जि.अकोला) टी पॉईंटवर गुटखा व सुगंधीत पानमसाला दिनांक २४ जानेवारी, २०१८ रोजी पकडण्यात आला आणि अमरावती जिल्ह्यात अशाच प्रकारची कारवाई करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच नाशिक येथील पोलिसांनी जप्त केलेला ३० लाख रुपयांचा गुटखा अन्न व औषध प्रशासनाच्या गोदामातून अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या संगनमताने चोरी होत असल्याचा प्रकार माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच गुटखा विक्रीवरील बंदीची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत व याप्रकरणी दोषी आढळलेल्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

(२) राज्यात प्रतिबंधीत अन्न पदार्थांच्या विक्री / वितरणावर प्रतिबंध आहेत त्याचे उल्लंघन करुन चोरट्या मार्गाने राज्यात येणाऱ्या गुटखा व पानमसाला,

स्वादिष्ट / सुगंधी तंबाखू, स्वादीष्ट व सुगंधीत सुपारी इत्यादींवर अन्न व औषध प्रशासन तसेच पोलिसांकडून वेळोवेळी धाडी/जप्तीची कारवाई करण्यात आलेली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) या प्रकरणी अन्न व औषध प्रशासनाकडून वेळोवळी कारवाई करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील गोंदिया जिल्हयासह पंढरपूर व मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील जिल्हा परिषद व खाजगी प्राथमिक शाळेमधील विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या पोषण आहाराबाबत

**(१२) * १११११३२ श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर व मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील जिल्हा परिषद व खाजगी प्राथमिक शाळेमधील विद्यार्थी शालेय पोषण आहारापासून वंचित असल्याचे दिनांक १९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, शालेय पोषण आहार योजना राबविण्याकरिता शासन कोट्यवधी रुपये खर्च करीत असूनही गोदिया जिल्हयामध्ये पोषण आहारात निकृष्ट दर्जाच्या मिठाचा उपयोग करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच शालेय पोषण आहारामध्ये सकस विटॅमिन व प्रोटीनयुक्त आहार मिळत नसल्यामुळे लहान बालकांच्या आहारामध्ये दुध, अंडी, केळी आदी पोषक आहाराचा नव्याने बदल करण्याची आवश्यकता असल्याबाबतची मागणी पालकानी केली असतांनाही याबाबत कोणतीही कार्यवाही वा उपाय योजना करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार शालेय पोषण आहारामध्ये दिल्या जाणाऱ्या आहाराचे निकष बदलण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हिंगणघाट (जि.वर्धा) येथील शासकीय अन्नपुरवठा गोदामातून अधिकृत रेशन दुकानांमधून दिला जाणारा गहू निकृष्ट दर्जाचा असल्याबाबत

**(१३) * ११०८२२ श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगणघाट (जि.वर्धा) येथील शासकीय अन्नपुरवठा गोदामातून अधिकृत रेशन दुकानांमधून नागरिकांना दिला जाणारा गहू निकृष्ट दर्जाचा असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, १२ किलो गव्हात दोन किलो कुशी व कचरा निघाल्याचे पुरावे अन्न पुरवठा अधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, असल्यास, उक्त प्रकरणी दोषी असणाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि, तक्रारदार श्री. रमेश शेगोकर, रा. हिंगणघाट यांनी १२ किलो गव्हात कुशी व कचरा आढळून आल्याबाबत तक्रार केली आहे.

(३) निरीक्षण अधिकारी, हिंगणघाट यांनी शासकीय गोदामाला भेट देवून धान्य साठ्याची सखोल तपासणी केली असता सदर धान्यसाठा हा सुस्थितीत व खाण्यायोग्य आढळला. पुरवठा निरीक्षक हिंगणघाट यांनीही ज्या स्वस्तधान्य दुकानातून धान्य साठा उचल केला त्या दुकानातील धान्य साठ्याचा पंचनामा व शिधापत्रिकाधारकांना विचारणा केली असता धान्यसाठा सुस्थितीत व खाण्यायोग्य मिळत असल्याचे सांगितले.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आबिटघर (ता.वाडा, जि.पालघर) गावातील औद्योगिक कारखान्यांमुळे होणारे प्रदूषण

**(१४) * ११५६८१ श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आबिटघर (ता.वाडा, जि.पालघर) गावातील औद्योगिक कारखान्यांनी पर्यावरण नियमांचे उल्लंघन केल्याचे दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रदूषित सांडपाण्यामुळे गावकऱ्यांना श्वसनाचे विकार जडले असून प्रदूषित पाणी प्यायल्याने शेतकऱ्यांची जनावरे दगावली असल्याबाबत स्थानिक ग्रामस्थांनी तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तसेच संबंधित कारखान्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) व (२) प्रश्नाधीन विषयाबाबत जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे तक्रार प्राप्त झाली आहे हे खरे आहे. सदर तक्रारीमध्ये संबंधित उद्योगांमुळे होणाऱ्या जल प्रदूषण व वायु प्रदूषणाचा उल्लेख असून त्यामध्ये जनावरे दगावल्याबाबतचा उल्लेख आढळून येत नाही.

(३) त्यानुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत करण्यात आलेल्या पाहणीदरम्यान दोषी आढळून आलेल्या मे. प्लस लुब्रिकंट्स, मे. ग्रीनटेक मेटल रिसायकल्स प्रा.लि. व मे. शक्ती मेटल इंडस्ट्रीज या उद्योगांना कारणे दाखवा नोटीसी बजावण्यात आल्या असून पुढील कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जनता विद्यालय, धसई (ता.मुरबाड, जि.ठाणे) या शाळेत शिक्षकांची बेदायकेशीर नियुक्ती करून शासकीय रक्कमेचा गैरव्यवहार केल्याबाबत

**(१५) * ११२२६५ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जनता विद्यालय, धसई (ता.मुरबाड, जि.ठाणे) या शाळेत संगनमताने पदांचा दुरुपयोग करून बनावट कागदपत्राद्वारे शिक्षकांची बेदायकेशीर नियुक्ती करून शासकीय रक्कमेचा गैरव्यवहार केल्याचीबाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी स्थानिक नागरिक व सामाजिक संस्थेने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) व (४) प्राथमिक चौकशी करण्यात आली आहे.

-----------------

## भांडगाव (ता.दौंड, जि.पुणे) येथील मीनाक्षी फॅरो प्रा.ली. कंपनी बंद करण्याच्या केलेल्या ठरावाबाबत

**(१६) * ११५२१३ श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांडगाव (ता.दौंड, जि.पुणे) येथील मीनाक्षी फॅरो प्रा. ली. या कंपनीमधून सतत होत असलेल्या प्रदूषणामुळे तसेच दिनांक ३० जानेवारी, २०१८ वा त्या सुमारास झालेल्या स्फोटामुळे उक्त कंपनी बंद करण्याचा ठराव पंचायत समिती, दौंड यांनी दिनांक ३१ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास घेतल्याचा निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले, असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त कंपनी बंद करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे.

(२) प्रश्नाधिन उद्योगामुळे होणाऱ्या हवा प्रदूषणाबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सदर उद्योगास दिनांक १९.१.२०१८ रोजी समजपत्र व दिनांक १५.२.२०१८ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असुन सद्यस्थितीत सदर उद्योग बंद आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## इंदापूर (जि.पुणे) तालुक्यातील १३ गावांमध्ये गॅस व पेट्रोलियमजन्य पदार्थ आढळल्याबाबत

**(१७) * ११५६३४ श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंदापूर (जि.पुणे) तालुक्यातील बावडा, वकीलवस्ती, सुरवड, शेटफळ, हवेली, वडापुरी, झगडेवाडी, गोखळी, तरंगवाडी, वनगळी, रजवडी, बनकरवाडी, करेवाडी, अगोटी नं.२ या १३ गावांमध्ये भूगर्भात पेट्रोल, गॅस व पेट्रोलियम पदार्थ असण्याची शक्यता वर्तविल्याने तेथील जमिनीत बोअर घेऊन चाचण्या सुरु असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावातून अनुकूल निष्कर्ष निघाल्यास राज्यातील २५ जिल्हयातून अशा प्रकारचा डाटा संकलित करुन त्याबाबतची माहिती केंद्र शासनाकडे पाठविण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पासाठी अंदाजे ६५० कोटी रुपये खर्च येणार असून यातून अकुशल कामगारांसाठी चार वर्ष रोजगार उपलब्ध होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय.

केंद्रीय पेट्रोलियम व नैसर्गिक वायू विभागाने सदर काम ONGC कडे सोपविले आहे.

(२) सदरची बाब ही केंद्र शासन व ONGC यांच्या अखत्यारीतील आहे.

(३) होय.

ओएनजीसी यांचेकडील पत्रात तसे नमूद आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हा परिषदेला सादिल निधी मिळत नसलेबाबत

**(१८) * ११४९८४ प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा परिषदेला राज्य शासनाकडून देण्यात येणारा ४ % सादिल निधी हा गत ७ वर्षापासून मिळाला नसल्याने शासनाकडे सादिल खर्चाचे १३ कोटी रु थकीत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निधीच्या अभावामुळे स्टेशनरी व इतर साहित्यांसाठी शिक्षकांना आर्थिकभार सहन करावा लागत असून विद्यार्थ्यांनाही अपुरी सुविधा मिळत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निधीबाबत शासनाकडे पाठपुरावा करण्यासाठी एक समिती स्थापन केली असून अनेकदा पत्रव्यवहार करून देखील याबाबत कोणताही तोडगा निघाला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने सादिल निधी मिळणेसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) शासन परिपत्रक, वित्त विभाग दिनांक १८ एप्रिल, २०१७ नुसार, स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदाने वितरीत करण्यापूर्वी सदर संस्थांकडून राज्य शासनास येणे असणारी रक्कम वसूल करुनच उर्वरीत अनुदान वितरीत करण्याबाबत आदेश दिले आहेत.

पुणे जिल्हा परिषदेकडून अखर्चित वसुलपात्र रक्कम शासनाकडे येणे बाकी आहे. सदर रक्कम शासनाकडे जमा केल्यानंतर पुणे जिल्हा परिषदेस सादिल अनुदान वितरीत करता येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

# खेड (जि.पुणे) तालुक्यातील भीमा तसेच भामा नदीच्या पाण्यात वाढलेल्या जलपर्णी मुळे प्रदूषण वाढून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत

**(१९) * ११५६५९ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.पुणे) तालुक्यातील भीमा तसेच भामा नदीच्या पाण्यात मोठ्या प्रमाणात जलपर्णी वाढलेली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाढलेल्या जलपर्णी मुळे साठलेल्या पाण्यात रासायनिक बदल होवून पाणी दुषित झाल्याने पाण्याला दुर्गंध येणे, जनावरांसाठी पाणी पिण्यायोग्य नसणे, तसेच नदीकाठच्या लोकांचे आरोग्य धोक्यात येवून मासेमारीवर परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास जलपर्णी तात्काळ काढण्यासाठी शासनामार्फत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार जलपर्णी प्रदूषण कायमस्वरूपी रोखण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) व (४) नदीपात्रामध्ये वाढलेली जलपर्णी बाहेर काढून शास्त्रोक्त पध्दतीने त्याची विल्हेवाट लावण्याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून जलसंपदा विभाग व स्थानिक स्वराज्य संस्था यांना कळविण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून जिल्हा परिषद, पुणे तसेच चाकण व राजगुरुनगर या स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या क्षेत्रामधील घरगुती सांडपाणी विनाप्रक्रिया नदीपात्रात सोडू नये या करिता उपाययोजना करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळांना पुरविण्यात येणाऱ्या शालेय पोषण आहाराच्या धान्य खरेदीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२०) * ११३७०६ श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळांना पुरविण्यात येणाऱ्या शालेय पोषण आहाराच्या धान्य खरेदीत कोटयावधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्या प्रकरणी विशेष तपासणी पथका (एसआयटी) मार्फत चौकशी करण्याची मागणी माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीनुसार सदरच्या गैरव्यवहाराची विशेष तपासणी पथका (एसआयटी) मार्फत चौकशी करण्यात येत आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) याबाबतची वस्तुस्थिती मा.मुख्यमंत्री महोदयांना अवगत करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील पाणीपुरवठा योजनांबाबत

**(२१) * १०९६३७ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यात राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमांतर्गत २९५ पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास त्यापैकी ५१ योजना अपूर्ण असुन त्यात अलिबाग तालुक्यातील उमटे धरणावरील जलशुद्धीकरण प्रकल्प, तिनविरा जलशुद्धीकरण प्रकल्प, रवेस ग्रामीण पाणी योजना, खंडाळा राष्ट्रीय पेयजल योजना, तसेच नेरळ येथील ममदापूर पाणी योजना या प्रमुख योजनांचा समावेश असल्याचे दिनांक १० फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच रायगड जिल्हयातील, जिल्हा परिषदेने 'तीनवीरा' धरणावर, राष्ट्रीय पेयजल योजनेंतर्गत, मंजूर केलेल्या वाढीव प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजने अंतर्गत, जल शुध्दीकरण केंद्राचे काम सन २०१४ पासून बंद असतानाही, सदरहू विकास काम प्रगती पथावर असल्याचा खोटा अहवाल, केंद्र शासनाच्या वेब साईटवर देण्यात येवून, सदरहू योजनेची कामे पूर्ण झाल्याची नोंद करण्यात आल्याबाबत माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गत ३ वर्षापासून, जल शुध्दीकरण केंद्र, फिल्टर प्लांट आदी प्रमुख कामे बंद व अपूर्ण असताना, शासनातील अधिकाऱ्यांनी, सुप्रभात इन्फ्रा झोन या कंपनीला, साडेतीन कोटी पैकी, सुमारे पावने तीन कोटी रुपयाचे देयक अदा केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू योजनेत झालेल्या गैरव्यवहाराची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार संबंधित दोषी अधिकारी, अभियंता आणि कंत्राटदार यांचेविरुध्द कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे, तसेच सदर पाणीपुरवठा योजना माहे मार्च, २०१८ पर्यंत पूर्ण करून ग्रामस्थांची पाणीटंचाई थांबविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय. हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

५१ योजनांचा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत समावेश असून योजनांची कामे निधीअभावी अद्याप पूर्ण झालेली नाहीत.

(३) हे अंशत: खरे आहे.

वाढीव तिनवीरा प्रादेशिक योजनेतील फीडर मेनचे काम पूर्ण झाले असून त्या पाईप लाईनद्वारे समाविष्ठ गावांना पाणी पुरवठा चालू करण्यात आल्याने केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर नोंद करण्यात आली आहे. जलशुद्धिकरण केंद्राचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) हे खरे नाही.

तिनवीरा, ता.अलिबाग, जि.रायगड ही योजना रु.३,१५,५५,५३९/- निव्वळ व रु.३,४३,९५,५३८/- ढोबळ इतक्या रकमेस मंजूर असून आजपर्यंत झालेल्या कामानुसार रु.२,५५,५९,९८५/- इतका निधी समितीकडे वर्ग करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खटाव (ता.पलुस, जि.सांगली) येथील पाण्याची टाकी पाडून सुमारे १५ लाखांचे नुकसान झालेबाबत

**(२२) * ११४७७७ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खटाव (ता.पलुस, जि.सांगली) येथील जुनी पाण्याची टाकी पाडतांना प्रशासन व ठेकेदाराने दक्षता न घेतल्यामुळे नवीन पाण्याची टाकी पाडून शासनाचे सुमारे रुपये १५ लाखांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावेळी एक व्यक्ती गंभीर जखमी झाली असून एका घराचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रशासनाचा निष्काळजीपणा व ठेकेदारांच्या चुकीमुळे ही घटना घडली असल्यामुळे संबंधितांवर कारवाई करण्याबाबत या घटनेतील बाधित घराची नुकसानभरपाई व जखमी व्यक्ती यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

पडलेल्या नविन उंच साठवण टाकीचे देयक अद्याप पर्यंत कंत्राटदाराला अदा करण्यात आलेले नाही त्यामुळे शासनाचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

मौजे खटाव ता पलूस येथील जुनी पिण्याच्या पाण्याची टाकी संबंधित ठेकेदार हे चुकीचे पध्दतीने पाडत असतांना ती नव्याने बांधलेल्या टाकीवर पडल्याने नविन पिण्याच्या पाण्याची टाकी पडली असून त्यामध्ये कोणीही जखमी झालेले नाही त्यामुळे आर्थिक मदत देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

ठेकेदार चुकीच्या पध्दतीने जुनी टाकी पाडत असतांना नवीन टाकी पडल्याने ती स्वखर्चाने नवीन टाकी बांधून देणेसंबंधिचे तसेच बाधित झालेल्या घराची दुरुस्ती करुन देणेबाबत ठेकेदाराने शपथपत्र दिले आहे.

तसेच नव्याने बांधणेत येणाऱ्या उंच साठवण टाकीसाठी पडलेल्या टाकीचा पाया जमिनीखाली असलेने अन्यत्र नविन उंच साठवण टाकी बांधण्यासाठी आवश्यक जागा ग्रामपंचायतीने उपलब्ध करुन दिली असून सदर ठिकाणी ठेकेदाराने दि.२१/०२/२०१८ रोजी काम सुरु केले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक पुरवठा विभागातील दोन कर्मचाऱ्यांना निलंबीत करण्यात आल्याबाबत

**(२३) * ११६०७३ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील नागरिकांना रेशनकार्ड देण्यास दिरंगाई तसेच नागरिकांनी सादर केलेल्या कागदपत्रात चुकीच्या त्रुटी दाखवून नागरीकांची फसवणूक करीत असल्यामुळे तसेच कामातील अनियमीततेच्या कारणास्तव पुरवठा विभागातील दोन कर्मचाऱ्याना निलंबीत करण्यात आल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये केवळ कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करुन पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, नाशिक जिल्हयातील शिधापत्रिका धारकांचे आधार क्रमांकाची जोडणी करण्यासाठी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी रेशन दुकानदारांकडून पैशांची मागणी करुन मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पुरवठा विभागातील गैरकारभाराबाबत अनेक तक्रारी प्राप्त झाल्यामुळे नाशिक पुरवठा विभागातील संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची चौकशी करण्यासाठी चौकशी समिती नेमण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शिधापत्रिका धारकांच्या आधार क्रमांक जोडणी करण्याच्या पुरवठा खात्याच्या कामासाठी रेशन दुकानदारांकडून पैसे गोळा करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबतचा चौकशी समितीचा अहवाल शासनाला सादर केला आहे काय चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानंसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४), (५) व (६) नाशिक जिल्हयातील नाशिक तहसिल कार्यालयातील कामकाजाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, नाशिक यांनी तपासणी पथकाची नेमणूक केली. तपासणी पथकाने केलेल्या तपासणीमध्ये पुरवठा विभागातील कामकाजात अनियमितता दिसून आल्याने श्रीमती सोनाली मंडलिक, अव्वल कारकून पुरवठा, हया सकृतदर्शनी दोषी आढळून आल्याने, त्यांना निलंबित करण्यात येवून विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे. तसेच तहसिलदार, नाशिक यांच्याविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

तसेच, नाशिक जिल्हयातील चांदवड तहसिल कार्यालयातील कामकाजात केलेल्या अनियमिततापणा करुन कर्तव्यात कसुर केल्याने उपविभागीय अधिकारी, चांदवड यांच्या अहवालाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, नाशिक यांनी श्री.योगेश जाधव, पुरवठा अव्वल कारकून यांना निलंबित करण्यात आले आहे.

अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत नाशिक जिल्हयातील शिधापत्रिकेचे संगणकीकरणाचे काम ७७ टक्के पूर्ण झालेले असून उर्वरित शिधापत्रिकेचे संगणकीकरणाचे काम पूर्ण करण्याची कार्यवाही सुरु आहे. यासाठी होणारा खर्च शासनाकडून प्राप्त अनुदानातुन खर्च करण्यात येत असल्याने जिल्हयातील कोणत्याही स्वस्त धान्य दुकानदार यांचेकडून पैशाची मागणी करण्यात आलेली अशी कुठलीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

-----------------

## मौ.तांदूळवाडी (ता.पालम, जि.परभणी) येथील स्वस्त धान्य दुकानातून शिधापत्रिका धारकांना शासनाकडून मोफत पुरविण्यात येणारा धान्याचा पुरवठा बंद केल्याबाबत

**(२४) * ११४५४७ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.तांदूळवाडी (ता.पालम, जि.परभणी) येथील स्वस्त धान्य दुकानातून माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान अन्नपूर्णा शिधापत्रिकाधारकांना शासनाकडून मोफत पुरविण्यात येणारा धान्याचा पुरवठा बंद करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, अन्नपूर्णा शिधापत्रिकाधारकांना शासनाकडून मोफत पुरविण्यात येणारा धान्याचा पुरवठा पुर्ववत सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१), (२), (३) व (४) अन्नपूर्णा योजनेचे केंद्र शासनाकडून नियतन प्राप्त झालेले नाही, याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

मौ.तांदूळवाडी, ता.पालम या गावात अन्नपूर्णा योजनेचा एकही लाभार्थी नाही.

-----------------

## राज्यात प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील गुणवंत विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीच्या रक्कमेत वाढ करण्याबाबत

**(२५) * ११६३३८ श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)राज्यातील गुणवंत विद्यार्थ्यांना गरीब परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित राहावे लागू नये यासाठी शिक्षण विभागाने १९५४ पासून ४ थी व ७ वी मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांची स्कॉलरशिप परीक्षा घेऊन दरमहा शिष्यवृत्ती सुरु केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील गुणवंत विद्यार्थ्यांना शासनाकडून शिष्यवृत्तीची दरमहा १०० रुपये इतकी अल्प रक्कम देण्यात येत असल्याने तसेच शिष्यवृत्ती मध्ये वाढ होत नसल्याने शिष्यवृत्ती परीक्षेसाठी बसणाऱ्या विद्यार्थी संखेत लक्षणीय घट झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक खर्चात मोठया प्रमाणात वाढ झाल्याने तसेच शिष्यवृत्तीची रक्कमही अल्प प्रमाणात असल्याने पालक व विद्यार्थी शिष्यवृत्ती मिळवण्याबाबत प्रयत्नशील नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास शिष्यावृतीच्या रक्कमेत वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने शासनाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर प्रस्ताव तत्काळ मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) अशंतः खरे आहे.

(३) नाही.

(४) व (५) होय.

सन २०११ च्या जनगणनेनुसार सदर शिष्यवृत्तीच्या दरात वाढ करणेबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## राज्यातील १२ हजार विना अनुदानीत इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे आरटीईचे ६५० कोटी रूपये थकीत असल्याबाबत

**(२६) * १०८६४७ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १२ हजार विना अनुदानीत इंग्रजी माध्यमाच्या शाळांना 'राईट टु एज्युकेशन' या कायद्यात समाविष्ट केल्यामुळे त्या शाळेमधील २ लक्ष विद्यार्थ्यांचे आरटीईचे ६५० कोटी रूपये शासनाकडे थकीत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या इंग्रजी माध्यमाच्या शाळांना शासनातर्फे २५ टक्के प्रवेश आरटीई अंतर्गत देणे बंधनकारक केले असुन त्याप्रमाणे प्रती विद्यार्थी रु.१८,६००/- देण्यात येणार होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या शैक्षणीक संस्थांना शासनातर्फे आरटीईअंतर्गत सन २०१३-१४ व सन २०१४-१५ याकरीता ६० कोटी रूपये उपलब्ध करून देण्यात आले परंतु त्यानंतर अद्यापपर्यंत कुठलाही निधी उपलब्ध करून देण्यात आलेला नसल्यामुळे संस्था संस्थाचालकांना आर्थिक भार सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार विना अनुदानीत इंग्रजी माध्यमाच्या शाळांना आरटीई चा निधी उपलब्ध करून देण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) अंशतः खरे आहे.

(३) हे खरे नाही.

तथापि, आरटीईअंतर्गत २५ टक्के राखीव जागांवर प्रवेशित विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काकरिता सन २०१७-१८ पर्यंत रु.१६४.२० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हरिहरेश्वर (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) येथील मारळ पाणी पुरवठा योजनेबाबत

**(२७) * ११६२२९ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीवर्धन (जि.रायगड) तालुक्यातील हरिहरेश्वर येथील मारळ पाणीपुरवठा योजना मंजूर असूनही ती पूर्ण झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेवर १० कोटी मंजूर असूनही ८ ते ९ कोटी रूपये खर्च होवूनही अद्यापपर्यंत अनियमितता असून ही योजना पूर्ण झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, असल्यास, उक्त योजना पूर्ण होण्याकरीता कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे, तसेच उक्त योजना केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) रायगड जिल्हयातील तालुका श्रीवर्धन येथील हरिहरेश्वर येथील मारळ पाणी पुरवठा योजना भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेली असून आर्थिकदृष्ट्या अंतिम करण्याची प्रक्रिया सुरु आहे. सद्य:स्थितीत नळ पाणी पुरवठा योजनेतून सदर गावाला नियमित व पुरेसा पाणी पुरवठा सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुरुड (जि.रायगड) येथील रेशनिंग दुकानातील धान्य काळ्या बाजारात विकले जात असल्याबाबत

**(२८) * ११५३०६ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरुड (जि.रायगड) शहरातील नगरपरिषद शाळा क्र.१ च्या बाजूला असलेल्या शासनमान्य रेशनिंग दुकानातील अंत्योदय योजनेंतर्गत दारिद्र्य रेषेखालील लोकांना कमी किंमतीत व मोफत दिले जाणारे धान्य काळ्या बाजारात विकत असल्याचे दिनांक १० फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर प्रकरणी रेशन दुकानदार व व्यापाऱ्यांविरोधात मुरुड पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार सदर प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) दिनांक ०६.०२.२०१८ रोजी दत्तकृपा महिला बचत गट संचालीत रास्तभाव धान्य दुकानदार यांना वाटप करण्यात आलेल्या तांदळातील ३० गोणी तांदूळ सदर दुकानातून काळाबाजाराने दुकानदार गौतम छगनदास जैन, रा. मुरूड बाजारपेठ, ता.मुरूड यांना विक्रीकरीता माल टेम्पोमधून उतरवीत असताना पकडण्यात आला. सदर माल जैन यांच्या किराणा दुकानात व टेम्पोत मिळून आल्याने दोन सरकारी पंचासमक्ष तहसिलदार, मुरूड यांनी सदरचा तांदूळ व टेम्पो जप्त करून तांदूळ शासकीय धान्य गोदाम मुरूड येथे जप्ती रजिस्टरी नोंद करून ठेवण्यात आलेला आहे.

नमुद गुन्ह्यातील आरोपी विरूध्द जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अंतर्गत मुरुड पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर दत्तकृपा महिला बचत गट रास्त भाव धान्य दुकान मुरुड-१ सील करण्यात आलेला असून सदर दुकान साईकृपा रास्त भाव धान्य दुकान मुरुड-४ यांना जोडण्यात आले आहे.

दि.०७/०२/२०१८ रोजी दाखल केलेल्या गुन्ह्यानुसार जिल्हा पुरवठा अधिकारी, रायगड यांनी सौ.शितल संतोष घरत, दत्तकृपा महिला बचत गट, रास्त भाव धान्य दुकान मुरुड क्र.१ यांना महाराष्ट्र अनुसूचित वस्तू किरकोळ विक्रेता अनुज्ञाप्ती आदेश १९७९ मधील तरतुदीनुसार नोटीस देऊन सुनावणीस हजर राहण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील २३ जिल्ह्यात स्वच्छ भारत मिशनची कामगिरी असमाधानकारक असल्याबाबत

**(२९) * ११६०९९ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २३ जिल्ह्यात स्वच्छ भारत मिशनची कामगिरी असमाधानकारक असून शौचालयासाठी निधी देऊनही अमरावती, यवतमाळ जिल्ह्यांचा निधी अखर्चित राहील्याने मा.पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांनी नाराजी व्यक्त केली असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यस्थितीत राज्यात १ लाख ८६ हजार शौचालये नादुरुस्त असून दुरुस्तीचे ५२ कोटी रुपये अखर्चित असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) स्वच्छ भारत मिशन अंतर्गत स्वच्छ भारत कोष ट्रस्ट मार्फत नादुरूस्त शौचालय दुरूस्त करून वापरात आणण्यासाठी राज्यास रूपये ५२.१६ कोटी प्राप्त निधी राज्यातील २३ जिल्ह्यांना वितरीत करण्यात आलेला आहे.

यवतमाळ जिल्हयास स्वच्छ भारत कोष अंतर्गत रुपये २०२.६७ लक्ष निधी वितरीत करण्यात आला. त्यापैकी रूपये ९३.०१ निधी खर्च झाला आहे व रूपये १०९. ६६ लक्ष इतका निधी शिल्लक आहे. यवतमाळ जिल्हयात एकूण ६६४९ नादुरूस्त शौचालयापैकि २२७४ इतकी शौचालये लाभार्थ्यांनी स्वत: दुरुस्ती करुन वापरात आणलेली आहेत.

स्वच्छ भारत कोष अंतर्गत रूपये २४०.९५ लक्ष निधी अमरावती जिल्हयास वितरीत करण्यात आला असून सदर निधी खर्च न झाल्यामुळे शिल्लक आहे. अमरावती जिल्हयात एकूण ७६२३ नादुरूस्त शौचालयापैकी १२३४ इतकी शौचालये दुरुस्ती करुन वापरात आणलेली आहेत.

(२) राज्यात पायाभूत सर्वेक्षणानुसार २ लक्ष ३९ हजार १६६ इतकी शौचालये नादुरुस्त होती, त्यापैकी १ लक्ष ४ हजार ८९६ इतकी शौचालये दुरुस्त करुन वापरात आणण्यात आलेली आहेत. सद्य:स्थितीत दिनांक १२ मार्च, २०१८ अखेर १ लक्ष ३४ हजार २७० इतकी शौचालये शिल्लक आहेत. नादुरुस्त शौचालये दुरुस्त करुन वापरात आणण्याकरीता स्वच्छ भारत कोष अंतर्गत वितरीत करण्यात आलेल्या निधीपैकी रु.४७ कोटी ४७ लक्ष इतका निधी शिल्लक आहे.

(३) राज्यातील नादुरुस्त शौचालय लाभार्थ्यांचे माहिती शिक्षण व संवादाव्दारे प्रभावी प्रबोधन करण्यात आले आहे. स्वनिधी किंवा इतर निधी (वैयक्तिक, खाजगी उद्योजकांचे सामाजिक उत्तर दायित्व, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, वित्त आयोग) मधून नादुरुस्त शौचालय दुरुस्त करण्याबाबत लाभार्थ्यांकडून स्वत: पुढाकार घेण्यात येत आहे. शासनामार्फत स्वच्छ भारत कोष अंतर्गत शिल्लक निधीचा आढावा घेऊन लातूर, अकोला, बीड, नाशिक, नांदेड या जिल्हयांकडील शिल्लक निधी गोंदिया जिल्हयास पुनर्वितरण करण्यात आले आहे.

(४) स्वच्छ भारत कोष अतंर्गत शौचालये दुरूस्तीसाठीचा निधी जिल्हयांकडून खर्च करण्याची कार्यवाही सुरू आहे. ४३.८५% नादुरूस्त शौचालय दुरूस्त करण्यात आले आहे. बऱ्याच ठिकाणी ग्रामस्थांनी स्वत:चे पैसे वापरून दुरूस्ती केली असल्यामुळे खर्च कमी झाला आहे.

-----------------

## लातूर जिल्ह्यातील पाणी पातळी मोजण्याबाबत होत असलेली दिरंगाई

**(३०) * ११५२८० श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील गावांमधील भूजल साठ्याच्या नियमित नोंदी घेण्यासाठी जिल्हा भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेमार्फत गावांमध्ये निरीक्षण विहिरी आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जुन्या १०९ निरीक्षण विहिरी आणि नवीन ७७४ निरीक्षण विहिरी आहेत, परंतु नवीन ७७४ निरीक्षण विहिरींची अद्यापही पाणी तपासणी झालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तालुक्यांमध्ये जल सुरक्षा रक्षक नेमले असूनही जिल्हा परिषदेच्या पाणी व स्वच्छता विभागाचा ग्रामपंचायतीसोबत समन्वय नसल्याने निरीक्षण तपासणीत अडचणी येत असल्याचे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, लातूर मार्फत भूजल पातळीचा अभ्यास करण्यासाठी लातूर जिल्ह्यात सद्यस्थितीत ७९४ निरिक्षण विहिरी आहेत.

(२) व (३) लातूर जिल्ह्यातील एकुण ७९४ निरिक्षण विहिरींपैकी ३९ पाणलोट क्षेत्रात १०९ निरिक्षण विहिरींची स्थापना यापूर्वीच केलेली असून जलस्वराज्य टप्पा-२ अंतर्गत उर्वरित गावांत ६८५ निरिक्षण विहिरींची स्थापना नव्याने केलेली

आहे. भूजल पातळीचा अभ्यास करण्याकरीता या निरिक्षण विहिरींची वर्षातून माहे जानेवारी, मार्च, मे व ऑक्टोबर महिन्यात नोंदी घेतल्या जातात. नव्याने स्थापित केलेल्या निरिक्षण विहीरींच्या नोंदी जलसुरक्षकांमार्फत घेण्यात येत असून त्याचे संकलन जिल्हास्तरावर करण्यात येत आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गोरेगाव, मुंबई येथील दादासाहेब फाळके चित्रनगरीतील 'व्हिसलिंग वुड' या संस्थेला दिलेली जमीन ताब्यात घेण्याबाबत

**(३१) * १०९६४० श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील, गोरेगाव (पूर्व), दादासाहेब फाळके चित्रनगरीतील, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाने 'व्हिसलिंग वुड' या संस्थेला दिलेली २२ एकर जमीन परत ताब्यात घेणेबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने आदेश देऊनही अद्याप महामंडळाने सदरहू जमीन ताब्यात घेतली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जमीन ताब्यात घेणेबाबत, महामंडळास लागत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सद्य:स्थितीत 'व्हिसलिंग वुड' या संस्थेच्या एकूण किती एकर जमीन ताब्यात आहे, तसेच सदर जमीन तात्काळ शासन तथा महामंडळातर्फे, अद्याप ताब्यात घेणेबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तसेच कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

व्हिसलिंग वूड्स् यांना २० एकर जागा देण्यात आली होती. मा.उच्च न्यायालयाने दि.०९.०२.२०१२ रोजी दिलेल्या निर्णयान्वये १४.५० एकर जागा तात्काळ व उर्वरीत ५.५ एकर जागा दि.३१.०७.२०१४ किंवा त्यापूर्वी परत

करण्याचा निर्णय दिला. त्यानुसार १४.५० एकर जागा महामंडळाच्या ताब्यात घेण्यात आली आहे. तथापि, सदर आदेशाविरुध्द व्हिसलिंग वुडस् यांनी मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली विशेष अनुमती याचिका फेटाळल्यानंतर मा.उच्च न्यायालयाकडे दाखल केलेल्या पुर्नविलोकन याचिकेवरील दि.३१.०७.२०१४ रोजीच्या सुनावणी दरम्यान व्हिसलिंग वुडस् यांच्या ताब्यात असलेली ५.५ एकर जागा महामंडळास परत करण्याच्या आदेशास स्थगिती दिली असल्यामुळे सदर जागा ताब्यात घेता आली नाही.

(३) व्हिसलिंग वुडस् यांच्या ताब्यात सध्या ५.५ एकर जमीन असून प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने सदर जमीन ताब्यात घेण्यास स्थगिती आहे. या आदेशाविरुध्द महामंडळाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली विशेष अनुमती याचिका फेटाळली असून मा.उच्च न्यायालयात पुर्नविलोकन याचिका प्रलंबित आहे. प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने जमीन ताब्यात घेण्याची कार्यवाही करता येत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील ४३ नळपाणी पुरवठा योजनेचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(३२) * ११४५४८ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागरी) तालुक्यातील ४३ नळपणी पुरवठा योजनेचे काम गत एक वर्षापासून अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुकास्तरीय समितीने पाणीपुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष व सचिव तसेच ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसेवक यांच्यासमवेत बैठका घेऊन ४३ नळ पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्ण करण्यासंबंधी तसेच उपविभागीय अभियंता यांना सूचना देऊनही कामे अद्याप सुरु झाली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नळपाणी पुरवठा योजनेची कामे त्वरीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील ४३ नळपाणी पुरवठा योजना भौतिकदृष्ट्या पूर्ण असून आर्थिकदृष्ट्या अपूर्ण आहेत. सदर ४३ योजना पूर्ण करण्यासाठी तालुकास्तरीय समितीने सुनावणी घेऊनही अपूर्ण असल्याने त्या योजना पूर्ण करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी दिनांक ०७.१२.२०१७ व दिनांक २२.१२.२०१७ रोजी सुनावणी घेण्यात आली. त्यानुसार योजना पूर्ण करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

सद्य:स्थितीत ३९ योजनेतून पाणी पुरवठा सुरु असून २ योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत व जागेच्या बक्षीसपत्राअभावी २ योजनांचे काम सुरु होऊ शकले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तळोजा (ता.पनवेल) औद्योगिक विभागातील वाढत्या प्रदूषणाबाबत

**(३३) * ११५५४६ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळोजा (ता.पनवेल) औद्योगिक विभागातील वाढत्या विघातक विषारी प्रदूषणाची दखल घेवून पर्यावरण मंत्रालयाने प्रदूषण करणारे कारखाने बंद केले आहेत, हे खरे आहे आहे काय,

(२) असल्यास या विभागातील पडघे गावाजवळ प्लॉट नं. १८५ (१) मध्ये गेल्या काही महिन्यापूर्वी मच्छी कंपनी सुरु करण्यात आली असून या कंपनीतून सडकी कुजलेली मच्छी आणून टाकण्यात येत असून तिच्यावर प्रक्रिया करण्यात येते असे दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास परिसरात दुर्गंधी पसरून प्रदुषणाने पडघे, नावडे गाव व परिसरातील नागरिक हैराण असून उग्र वासाने लहान मुलांच्या आरोग्यावर परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार दोषी असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे.

(२) तळोजा एम.आय.डी सी मध्ये प्लॉट नबर डब्ल्यु १८५(१) ची पाहणी केली असता मे.युनिव्हर्सल मरिन प्रॉडक्टस या उदयोगाने दोन शेड बांधलेले असून एका शेडमध्ये सुकलेली मच्छी तसेच दुसऱ्या शेडमध्ये मच्छी सुकविण्यासाठी लागणारी यंत्रसामुग्री अर्ध स्वरूपात उभारण्याचे काम झाल्याचे निदर्शनास आले. सदर उद्योगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संमतीपत्र घेतलेले नसल्याने उद्योगास दिनांक १९.०१.२०१८ च्या पत्रान्वये काम बंद करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.

(३) व (४) याबाबत चौकशी करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हयातील अन्नधान्य साठ्याचा शासकीय गोदामातून अपहार झाल्याबाबत

**(३४) * ११४५५० श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील शासकीय अन्नधान्य गोदामाची पुरवठा आयुक्त कार्यालय मुंबई येथील गोदाम तपासणी पथकाने दिनांक १ ऑगस्ट, २०१६ ते दिनांक ९ ऑगस्ट, २०१६ या कालावधीत तपासणी करुन अहवाल दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तपासणीमध्ये गहू वजन १३८४१.६२ क्विं. व तांदुळ वजन ५३००.१८ क्विं. कमी आढळून आला एकुण १९१४१.८ क्विं.धान्य व त्यांची Economic cost प्रमाणे गहु रक्कम रुपये ३,२४,५५,८३१/- व तांदुळ रुपये १,७३,१४,०९८/- असे एकूण रुपये ४,९७,६९,९२९/- इतक्या रुपयांचे शासकीय धान्य अपहार झाल्याने शासनाचे आर्थिक नुकसान झाल्याचे नमुद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गैरव्यवहारात श्री.संतोष वेणीकर तत्कालीन जिल्हा पुरवठा अधिकारी, परभणी यांच्यासह एकूण २० अधिकारी/कर्मचारी जबाबदार असून त्यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ व १२ अन्वये उपायुक्त (पुरवठा) औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांचेकडून संयुक्त विभागीय चौकशीचा प्रस्ताव सादर करण्यात आला असून सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने संबंधित सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या दोषारोपाची शासन स्तरावर छाननी सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी दोषारोपाची छाननी केंव्हापासून सुरु आहे व ती केंव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षीत आहे तसेच विभागीय चौकशी त्वरीत पूर्ण करुन दोषींवर कारवाई करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तसेच अपहारीत रक्कम दोषींकडून वसुल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय खरे आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) होय हे खरे आहे.

(४) प्रस्तावाची छाननी सुरू असून छाननीनुसार अपचारी यांचा सेवातपशिल व अधिकची माहिती दि. ०१.०३.२०१८ अन्वये मागविण्यात आली आहे. सदर माहिती प्राप्त होताच विभागीय चौकशी त्वरीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करून चौकशीअंती दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

(५) अपहाराच्या एकूण रकमे पैकी रु.१२,२०,०००/- गोदामपालाने शासन जमा केले आहे. उर्वरित रक्कम विभागीय चौकशीअंती दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्या कर्तव्य जबाबदारीनुसार वसुल करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.